लोकमत | दि. १८ जुलै २०२०

आसुर्लेचा विशाल सरवटे उत्पादन शुल्क परीक्षेत राज्यात प्रथम

लोकमत न्यूज नेटवर्क

पोर्ले तर्फ ठाणे : जिद्द, तळमळ, परिश्रमाची तयारी व परिस्थितीची जाणीव असेल तर जगात अशक्य असे काही नाही. लोकसेवेच्या १४ मेन परीक्षेत अपयशी ठरलेल्या आसुर्ले (ता. पन्हाळा) येथील विशाल सरवटे लोकसेवा आयोगाच्या राज्य उत्पादन शुल्क परीक्षेत राज्यात प्रथम आला.

विशाल सरवटे

शालेय जीवनापासून विशालला अधिकारी बनण्याची महत्त्वाकांक्षा होती. गावातील मराठी शाळा, कागल नवोदय, केर्ले हायस्कूल आणि स्वामी विवेकानंद महाविद्यालयातून बी.एस्सी इलेक्ट्रॉनिक्स पदवी मिळविलेले विशाल प्रत्येक वर्गात टॉपर होते. सहा वर्षांत १४ लोकसेवा आयोगाच्या पूर्व परीक्षा पास झाले; परंतु मेन परीक्षेतील यश काटावरच्या गुणांवर जात होतं.

गावातील बरोबरीची आणि आपल्या मागची मुले अधिकारी झाल्याची मनात सल होती आणि अभ्यासाला प्रेरणा देत होती. रोज १० तास अभ्यास करायचा. कोणताही क्लास न लावता स्व:अध्ययनातून विशालने यशाला गवसणी घातली. सन २०१९ च्या कोल्हापूर जिल्हा तलाठी परीक्षेत त्यांना यश मिळाले होते. मात्र नेमणूक थांबविली आहे. तोपर्यंत लोकसेवा आयोगाच्या २०१९ मध्ये दिलेल्या राज्य उत्पादन शुल्क उपनिरीक्षक परीक्षेत राज्यात पहिला आला.

पुण्य नगरी शनिवार, १८ जुलै २०२०

'विवेकानंद'ची गुणवत्तेची परंपरा कायम

कोल्हापूर : प्रतिनिधी

विवेकानंद महाविद्यालयाने बारावी बोर्ड परीक्षेत कला, वाणिज्य व विज्ञान परीक्षेत आपली सर्वोत्तम गुणवत्तेची यशस्वी परंपरा याही वर्षी कायम राखली. या निकालात विज्ञानमध्ये पूजा प्रशांत पाटील हिने ९५.८४ टक्के गुण मिळवून प्रथम येण्याचा मान मिळवला. सुशांत आप्पासाहेब शेळके याने ९४.६१ टक्के गुण मिळवून दुसरा, तर तुषार गणपती कांबळे याने ९४.३० टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक मिळवला.

विज्ञान शाखेत सुमारे २६ विद्यार्थ्यांनी ९० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळवले. विज्ञान शाखेतील अभिजित ठमके (कॉम्प्युटर सायन्स), धैर्यशील कांबळे (गणित), विजय नायक (केमिस्ट्री), पार्थ ढवळे (गणित), व श्रावणी कुलकर्णी (गणित) यांनी पैकीच्या पैकी गुण मिळवले.

वाणिज्य विभागात सर्वेश संतोष नागावकर हा ९६.६१ टक्के गुण मिळवून महाविद्यालयात पहिला आला, तसेच ऐश्वर्या रविराज शेट्टी, प्राजक्ता बाहुबली होसुरे, वेरोनिका श्ररण नदार, ऋतुजा ज्ञानदेव शिंदे यांनी ९३.८४ गुण मिळवत द्वितीय क्रमांक पटकावला. पद्मा रवींद्र यादव हिने ९३.६९ टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक मिळवला. वाणिज्य शाखेत सुमारे ३० विद्यार्थ्यांनी ९० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळवले.

सागर जाधव, पद्मा यादव, आकांक्षा संकपाळ (अकौंटन्सी), सागर जाधव, सर्वेश नागावकर, ऐश्वर्या शेट्टी, सिद्धेश कालेकर, श्रद्धा पाटील (गणित), सागर जाधव व सर्वेश नागावकर (आय.टी.) यांनी शंभर गुण प्राप्त केले.

कला शाखा कोमल बाळासो खोत प्रथम (८७.८४), ऋचा संदेश गावंदे, अभिजित कृष्णात कुंभार, अपूर्वा गजानन स्वामी द्वितीय (८६.७६), तर कल्याणी मनोहर पाटील तृतीय (८६.४६) क्रमांक पटकावला. या यशाबद्दल श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, संस्था सचिव प्राचार्या शुभांगी गावडे, संस्थेचे सहसचिव (प्रशासन) प्राचार्य डॉ. युवराज भोसले, प्राचार्य डॉ. एस वाय होनगेकर, प्रभारी प्राचार्य डॉ. डी. बी. पाटील यांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. सदर विद्यार्थ्यांना कला व वाणिज्य विभागप्रमुख प्रा. बी. एस. लाड, प्रा. शिल्पा भोसले, विज्ञान विभागप्रमुख प्रा. व्ही. बी. कदम व सर्व सहकारी प्राध्यापकांचे मार्गदर्शन लाभले.

पुढारी शनिवार, १८ जुलै २०२०

'विवेकानंद'चे बारावी परीक्षेत यश

सर्वेश नागावकर, पूजा पाटील, कोमल खोत प्रथम

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

१२ वी परीक्षेच्या ऑनलाईन निकालात विवेकानंद महाविद्यालयाने कला, वाणिज्य व विज्ञान शाखांनी गुणवत्तेची यशस्वी परंपरा यंदाही कायम राखली आहे. सायन्स शाखेत पूजा प्रशांत पाटील हिने ९५.८४ टक्के गुण मिळवून महाविद्यालयात प्रथम येण्याचा मान मिळविला. वाणिज्य शाखेत सर्वेश संतोष नागावकर याने ९६.६१ टक्के गुणांसह पहिला क्रमांक मिळविला. कला शाखेत कोमल बाळासाहेब खोत हीने ८७.८४ टक्के गुणांसह प्रथम क्रमांक पटकाविला.

विज्ञान शाखेत सुशांत आप्पासाहेब शेळके याने ९४.६१ टक्के गुण मिळवून दुसरा आणि तुषार गणपती कांबळे याने ९४.३० टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक मिळविला. विज्ञान शाखेत सुमारे २६ विद्यार्थ्यांनी ९० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळविले. याशिवाय राज्यात विषयात प्रथम आलेले गुणवंत

सर्वेश नागावकर

पूजा पाटील

कोमल खोत

विद्यार्थी अभिजित ठमके (कॉम्प्युटर सायन्स), धैर्यशील कांबळे (गणित), विजय नायक (केमिस्ट्री), पार्थ ढवळे (गणित) व श्रावणी कुलकर्णी (गणित) यांनी पैकीच्या पैकी गुण मिळविले.

वाणिज्य शाखेत ऐश्वर्या रविराज शेट्टी ९३.८४, प्राजक्ता बाहुबली होसूरे ९३.८४, वेरोनिका श्रवण नदार ९३.८४, ऋतुजा ज्ञानदेव शिंदे ९३.८४ यांनी द्वितीय तर पद्मा रवींद्र यादव हिने ९३.६९ टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक मिळविला. सुमारे ३० विद्यार्थ्यांनी ९० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळविले. राज्यात विषयात प्रथम आलेले (पैकीच्या पैकी गुण संपादन केलेले विद्यार्थी) : सागर जाधव, पद्मा यादव, आकांक्षा संकपाळ (अकौंटन्सी), सागर जाधव, सर्वेश नागावकर, ऐश्वर्या शेट्टी, सिद्धेश कालेकर, श्रद्धा पाटील (गणित), सागर जाधव व सर्वेश नागावकर (आय.टी.). कला शाखेत ऋचा संदेश गावंदे, अभिजित कृष्णात कुंभार, अपूर्वा गजानन स्वामी यांनी ८६.७६ टक्के गुण मिळवून दुसरा क्रमांक मिळवला. कल्याणी मनोहर पाटील हिने ८६.४६ टक्के गुणांसह तिसरा क्रमांक पटकाविला.

सर्वांना संस्थेचे कार्याध्यक्ष अभयकुमार साळुंखे, सचिव शुभांगी गावडे, प्राचार्य डॉ. युवराज भोसले, प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर, प्राचार्य डॉ. डी. बी. पाटील, प्रा. बी. एस. लाड, प्रा. सौ. शिल्पा भोसले, प्रा. व्ही. बी. कदम आदींचे मार्गदर्शन लाभले.